स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**सातारा जिल्हा परिषद सातारा**

**सामान्य प्रशासन विभाग**

**कार्यालयाचा पत्ता :- जिल्हा परिषद मुख्य इमारत, ४ था मजला,सातारा-कोरेगांव रोड, सदर बझार कँम्प,ता.जि.सातारा – ४१५००१**

**कार्यालय दूरध्वनी क्र. ०२१६२ - २९५०५३** Email- dyceogadstr@gmail.com


जा.क्र.जिपसा/साप्रवि/आस्था-1(2)/56/2025 दिनांक- 22.04.2025

## जाहीर दरपत्रक मागणी

सातारा जिल्हयातील तमाम गौरवचिन्ह पुरवठाधारकांना कळविण्यात येत आहे की, सातारा जिल्हा परिषद, सातारा अंतर्गत दरमहा सेवानिवृत्त होणा-या सेवानिवृत्त कर्मचा-यांसाठी आनंदी सेवानिवृत्ती योजनेंतर्गत सन 2025-2026 या आर्थिक वर्षामध्ये अंदाजित 470 सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांसाठी गौरवचिन्ह देण्यात येणार आहे. सदर गौरवचिन्ह खरेदीसाठी दर करार करणेचा असुन इच्छुक पुरवठाधारकांनी गौरचिन्ह बनविण्याचे दरपत्रक खालील अटीस अधीन राहुन दि. 29.04.2025 रोजी दु. 4.00 वाजेपर्यंत पोहोचेल अशा रितीने समक्ष अथवा पोष्टाने पाठवावेत.

**अटी:-**

1. दरमहा या कार्यालयामार्फत कळविणेत आलेल्या सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या संख्येनुसार दरमहा 15 तारखेपर्यंत गौरवचिन्हाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.
2. गौरचिन्हाची Size- 9.5 इंच (12mm) एवढी व गौरवचिन्ह लाकडी (Wooden) पासुन बनवलेले असावे.
3. जे कोणी पुरवठाधारक वरील प्रकारच्या दरमहा सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांसाठी गौरवचिन्ह पुरवठा करु इच्छितात त्यांनी आपली दरपत्रके सिलबंद लखोटयातुन निम्नस्वाक्षरीत यांचे नावे दि. 29.04.2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत कार्यालयात समक्ष अथवा पोष्टाने पोहोच होतील अशा बेताने पाठवावेत.
4. दि. 29.04.2025 रोजी दुपारी 4.00 वा. नंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.
5. दरपत्रकामध्ये दिलेल्या दरामध्ये सर्व करांचा समावेश असावा.
6. सदरचा दर करार 1 (एक) वर्षासाठी बांधील राहील.
7. विहित मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. 29.04.2025 रोजी किंवा त्यानंतर उघडणेत येतील.
8. प्राप्त झालेल्या दरपत्रकामध्ये खाडाखोड नसावी.
9. दर्जेदार गौरवचिन्हांचा पुरवठा करणेत यावा.

10. दरमहा सादर केलेल्या गौरवचिन्हांच्या रकमेची बील देयके सदर महिन्याच्या 25 तारखेपर्यंत देण्याची कार्यवाही करावी.
11. प्रत्येक महिन्यात सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या यादीनुसार सेवानिवृत्त कर्मचा-यांची नांवे गौरवचिन्हांवर छपाई करुन मिळावी.
12. प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणेचा अगर नाकारणेचा अधिकार निम्नस्वाक्षरीत यांनी राखुन ठेवला आहे.

Signed by
Nilesh Nivrutti Ghule
Date: 24-04-2025 18:24:47

**(निलेश घुले)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)**
**सातारा जिल्हा परिषद, सातारा**

प्रत :- 1. कार्यालयीन नोटीस बोर्ड, सामान्य प्रशासन विभाग, सातारा जिल्हा परिषद, सातारा.
2. चौकीदार, चौकशी कक्ष, तळमजला,सन विभाग, सातारा जिल्हा परिषद, सातारा.